# ।। ॐ श्री साईराम ।।

# 'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'

# साई ज्ञानमौक्तिके

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १८ क

ॐ ॐ ॐ

आता मी तेलगू सनातन सारथीच्या मार्च २००१ मध्ये प्रकाशित झालेल्या मुद्यांचा समावेश करतो. भगवानांनी हे सर्व साहित्य, ज्यांना इंग्रजी समजतं, त्यांच्यासाठी उपलब्ध करण्याची परवानगी दिल्यामुळे मला फार आनंद होत आहे. ज्यांना तेलगूमधील साहित्य वाचता येत नाही, त्यांच्याकरता ते इंग्लिशमधून उपलब्ध करून देण्याची संधी भगवानांनी मला दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हे साहित्य तेलगूभाषिकांपुरतेच राहून, इंग्लिश भाषिकांना त्याचा आनंद घेता येत नव्हता याचे मला फार वाईट वाटत असे. स्वामी, ह्या संधीबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे.

ह्यावर भगवान काय म्हणाले?

ही घटना उन्हाळी वर्गानंतर स्वामी बंगलोरहून परत येत असताना घडलेली आहे. सर्वसाधारणपणे ते जून महिन्यात परत येतात, पण माझा अहवाल मार्च २००१ मध्ये प्रसिद्ध होत असल्याने ही घटना मागील वर्षांत घडलेली सांगत आहे.

मी तुम्हाला पूर्वी सांगितल्याप्रमाणे मी सनातन सारथीच्या संघाला घटनांचा गठ्ठा देतो. तथापि ते लोक एका वेळी त्यातील काही थोडेच प्रसिद्ध करतात. अर्थात पानांच्या संख्यांवर ते अवलंबून असते. कारण सगळंच मासिक केवळ माझ्या लेखनासाठी राखीव नसतं. सर्वांनाच त्यांचे लेख द्यायचे असतात आणि भगवानांची प्रवचने प्रसिद्ध करायची असतात. त्यासाठी सगळ्यांचे लेख द्यायचे असतात, म्हणून त्या घटना त्याच महिन्यात घडलेल्या असतील असे नाही हे स्पष्ट झालं का?

## ''भगवान भव्य स्वागताने पुट्टपर्तीला परतले''

भगवान बंगलोरहून परत येत होते आणि पुटपर्ती हे सारे गाव आनंदाने उड्या मारत होते. सर्व रस्ते सुशोभित केलेले होते. रस्त्यांच्या कडेकडेची सर्व गावे खूप छान सजवली होती. स्थानिक, गावकरी आणि दुकानदार जवळ जवळ ६०-७० लोक मोटार-सायकलींवरून गावाच्या वेशीवर स्वामींच्या स्वागताला जमलेले होते. त्यांनी ते प्रशाति-निलयमपर्यंत त्यांच्या सुरक्षिततेसाठी आले. मला त्यावेळी भागवतातील त्या दिवसाची आठवण आली. भगवान कृष्ण हे वृंदावनाहून मथुरेला आले त्यावेळी त्यांचे असेच आनंदोत्सवाने आणि उत्साहाने भव्य स्वागत झाले असेल. भगवान बाबांचे असेच उत्साहान, भव्य उत्साहाने स्वागत केले गेले.

आम्हाला असे समजले की स्वामी येताना मुद्दनहळी नावाच्या गावात थांबले होते. मुद्दनहळीमध्ये बाबांनी सुरू केलेली एक शाळा होती. या शाळेत १००० हून अधिक विद्यार्थी होते. याशिवाय शिकवण्याच्या कार्याला वाहून घेतलेले खूप शिक्षक आहेत. हे शिक्षक सर्व अविवाहित व उच्च शिक्षण घेतलेले होते. तर, मुद्दनहळ्ळीला मुक्काम करून, प्रवचन देऊन, प्रवास करून स्वामी पुटपर्तीला प्रशांतिनिलयमला पोचले तेव्हा ते अगदी ताजेतवाने दिसत होते. जराही थकलेले दिसत नव्हते. ते दमलेले, कंटाळलेले असेही दिसत नव्हते. त्यांच्या कपाळावर घामही नव्हता, अगदी खूप ताजेतवाने दिसत होते. हीच ती देवत्वाची खूण आहे.

अशा तऱ्हेने स्वामींचे इथे मोठ्या जल्लोषाने स्वागत झाले. वेदपठण करणाऱ्या मुलांनी त्यांचे स्वागत केले.

बँड वाजत होता, माणसे गात–नाचत होती आणि स्वामींना इथे पोहोचेपर्यंत जरी दुपारचे २.३० वाजले होते तरी ते ४ वाजता दर्शनासाठी तयार होते. पहा, अशा तऱ्हेने काम करणे आपल्याला कोणालाही शक्य नाही. त्यांच्या कामाची आखणी पाहूनच आपण थक्क होतो, थकतो. त्यांच्या कामाचे वेळापत्रकाप्रमाणे काम करणे तर सोडून द्या, पण आपल्यापैकी कोणालाही ते शक्य नाही. ते एवढे काम करूनही कायम ताजेतवाने दिसतात. हे खरोखरच स्तिमीत करणारे आहे.

## ‘‘शस्त्रक्रियेनंतर रोगी एका दिवसातच खाऊ–पिऊ शकतो.’’

स्वामी त्या दिवशी दुपारी ४ वाजता तेथे आले आणि विद्यार्थ्यांशी नेहमीप्रमाणे बोलले. ते बंगलोरमधील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलबद्दल बोलले.

बाबा म्हणाले, ‘‘तिथे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या उद्‌घाटनानंतर १० दिवसांतच शेकडो लोकांनी भेट दिली आणि बहुसंख्य शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यातील अधिकाधिक रोगी खूपच गरीब होते आणि त्यात बरीचशी मुलेही होती.

ते असंही म्हणाले, ‘‘तुम्हाला हे माहीत आहे का की ह्या हॉस्पिटलचे वैशिष्ट्य असे की शस्त्रक्रियेच्या दुसऱ्याच दिवशी रोगी खाण्यास सुरुवात करतो.’’

शस्त्रक्रियेच्या दुसऱ्याच दिवशी रोगी इडली खायला सुरुवात करतो, हेच ह्या हॉस्पिटलचे वैशिष्ट्य आहे.

आणि पुढे ते म्हणाले, ‘‘मी हॉस्पिटलमध्ये गेलो आणि मला एक मुलगी इडली खाताना दिसला. ती माझ्याकडे पाहून हसत होती. मला नमस्कार करत होती. डॉक्टरांनी मला सांगितलं की ह्या मुलीची आदल्या दिवशीच शस्त्रक्रिया झाली होती आणि आता ती अगदी ताजीतवानी दिसत होती आणि नमस्कार करत होती, जणू काय काहीही घडलंच नव्हतं. आपल्या हॉस्पिटलमध्ये अशा घटना घडत असतात.’’

## ‘‘दुराव्याच्या कल्पनेने लपलेले समाधान’’

मग मी हळुवारपणे म्हटले, ‘‘स्वामी, तुमच्या गैरहजेरीत पुटपर्तीचा आनंद, आकर्षण हरवलेलं होतं. ते एक वैराण खेडेगाव वाटत होते. ही जागा जणू काही परमेश्वराकडून विसरलेली जागाच वाटत होती. आम्हाला अगदी एकटं–एकटं वाटत होतं.’’

बाबांनी उत्तर दिलं, ‘‘तू असं का म्हणतोस? मी इथे नसेन, पण तुम्ही सर्वजण इथेच होतात. हे गाव वैराण झालं असं का म्हणतोस? तुम्ही सर्वजण इथेच होतात तर मग असं का म्हणतोस?’’

मग मी म्हणालो, ‘‘स्वामी, असं म्हटल्याबद्दल माफ करा. आता सगळीकडे किती आनंद झाला आहे. आता सगळ्यांना हसतमुख पाहा. याआधी सर्वांचे चेहरे एरंडेल तेल प्यायल्यासारखे दिसत होते. कोणीही आनंदी नव्हतं; सगळेजण खिन्न आणि गंभीर झाले होते.

त्यावर बाबा म्हणाले, ‘‘नाही, नाही. तू चुकत आहेस. आनंद हा तुमच्यातच लपलेला असतो. तो फक्त तुमच्याजवळच आहे.’’

मग मी म्हणलो, ‘‘स्वामी, मला माफ करा. जर आनंद माझ्या अंतरातच आहे तर तुम्ही इथे नसताना तो कुठे गेला होता? तो माझ्या अंतरात असेल, पण तुम्ही आल्यावर तो एकदम कसा बाहेर आला? तुम्ही नसताना तो माझ्या अंतरात असेल तर तुम्ही आल्यावरच तो एकदम कसा निर्माण झाला. तुम्ही नसताना त्याचं अस्तित्व मला जाणवलं नाही. हे कसं काय? कृपा करून आम्हाला याबद्दल स्पष्ट करून सांगावं.’’

भगवान म्हणाले, ‘‘नाही. तुम्ही तर आनंदाचे मूर्तस्वरूपच आहात. आनंद तुमच्या अंतरातच आहे, पण ती

जी माझ्या नसण्याची भावन– माझ्या अनुपस्थितीच्या कल्पनेमुळेच तुमच्या मनातील आनंद झाकोळून जातो. तुमच्या मनातील दुरत्वाच्या कल्पनेनेच, – स्वामी नसण्याच्या विचारानेच मावळून गेला.''

हे सर्व किती खरं आहे. आपण आपला मूळ स्वभावच विसरून गेलो आहोत. आपण सत्य, शांती आणि प्रेम याचे पूर्ण स्वरूप आहोत. पण फार दिवसांपूर्वीपासूनच आपण आपली खरी ओळख विसरून गेलो आहोत. आपल्या चुकीच्या विचारांनी आपण आपला खरा स्वभाव विसरून गेलो आहोत. म्हणजे ही चूक आपल्या चुकीच्या विचारांमुळेच होते, आपल्या मूळ, सत्य स्वभावामुळे नाही.

## ''गुजरातचा भूकंप''

मग हळूहळू आमचं संभाषण गुजरात धरणीकंपाकडे वळलं. ती वेळ साधारणपणे गुजरातमधील भूकंपाच्याच सुमाराची होती. स्वामी पुटपर्तीला येण्याआधीच त्यांनी बऱ्याचशा सूचना देऊन ठेवल्या होत्या. भूकंपग्रस्तांसाठी गाड्या भरभरून ब्लँकेट्स, अन्नपदार्थ, जीवनावश्यक लागणाऱ्या वस्तू पाठवल्या होत्या.

तेव्हा मी म्हणालो, ''आम्हाला असं कळलं आहे की, तुम्ही बंगलोरमध्ये असतानाच भूकंपपिडीतांना खूप वस्तू पाठवल्यात!''

बाबा ताबडतोब म्हणाले, ''मी जे करतो, त्याला मी प्रसिद्धी देत नाही. त्याची जाहिरात करत नाही. तुम्ही जे करता ते सांगत सुटता. का? कशासाठी? कारण तुम्हाला असं वाटतं की आम्ही कोणाला तरी मदत आहोत. माझ्याकरता हे 'कोणीतरी' नसतात. ती सर्व माझी माणसं आहेत. ती माझीच आहेत. मग ती त्याची प्रसिद्धी कशाला करू? मी माझ्या स्वत:च्या माणसांनाच मदत करत असताना, त्याची जाहिरात करण्याची गरजच नाही.''

किती छान आणि आश्चर्यकारक कल्पना आहे ही! भगवानांनी जवळजवळ ७५००० साड्या, पुरुषांसाठी आणि मुलांसाठी कपडे, उपयोगी वस्तू, तांदुळाची पोती, गहू, तेलाचे डबे, मोठमोठे मंडपासाठी कापड, कापडी छावण्या आणि सुमारे २००० तंबू (राहुट्या) गुजरातला पाठवले होते. ह्या सामानाबरोबरच ५० सेवादलाचे लोक प्रशांतिनिलयमहून पाठवले, त्यांच्याबरोबर सामानाची वाटणी बरोबर होते की नाही हे पाहावयास काही ज्येष्ठांना निरीक्षणासाठी पाठवलं होतं. त्यांनी तेथे होत असलेल्या आपत्कालीन मदतीवर देखरेख केली. खरंच, हे सर्व अविश्वसनीय काम केले आहे.

मग मी म्हटले, ''स्वामी, तुम्ही आपद्ग्रस्तांना केलेल्या मदतीचे मी वर्णन करू शकत नाही.''

बाबांनी माझ्याकडे वळून म्हटलं, ''मी याला 'मदत' असं म्हणतच नाही. तू तुझ्या पत्नीला आणि मुलांना मदत करतो असे म्हणशील का? नाही. त्यांची काळजी करणं ही तुझी जबाबदारीच आहे. ही सर्व माझीच मुले आहेत. त्यामुळे ती माझी जबाबदारीच होती. म्हणून कोणालाही ते माहीत असण्याची, जाणून घेण्याची किंवा आभार मानण्याची जरूरी नाही.''

ठीक आहे. त्यांना प्रश्न विचारण्याची हीच योग्य वेळ होती.

''स्वामी, तुम्ही स्वत: परमेश्वर आहात. तुम्ही हा गुजरातमधील धरणीकंप होऊच कसा दिलात? तुम्हीच तो थोपवू शकला असतात. तर तुम्ही का होऊ दिलात? आणि मग अशा तऱ्हेचा आपत्कालीन मदतीसाठी कॅम्प का उभारला असता? का? तुम्ही मुलाला रडायला का लावता आणि मग मुलाला शांत का करता? प्रथम मुलाला रडायला लावता आणि मग अंगाई गीत म्हणून झोपवता. अशा तऱ्हेचा भूकंप का व्हावा?

### ‘‘मी निसर्गामध्ये ढवळाढवळ करीत नाही.’’

कृपा करून हा मुद्दा लक्षात घ्या. बाबा म्हणाले, ‘‘जगामध्ये घडत असलेली प्रत्येक गोष्ट ही निसर्गनियमाप्रमाणेच होत असते. निसर्ग ही परमेश्वराची निर्मिती आहे. निसर्ग हा नेहमी त्याच्या स्वत:च्या शिस्तीप्रमाणे आणि नियमांप्रमाणेच कार्य करत असतो. तो कधीही मर्यादा ओलांडत नाही. ती माझीच निर्मिती असल्यामुळे मी त्यात हस्तक्षेप करत नाही. म्हणून मी निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन होऊ देत नाही. म्हणजेच धरणीकंप, आगी लागणं, पूर येणं हे सर्व निसर्गाच्या नियमांप्रमाणेच होत असतं. पण गरीबांना आणि गरजूंना मदत करण्यासाठी धावून जाणं हे मानवाचं प्रेम आहे. जगात जे घडत असतं ते निसर्गाच्या नियमानेच होते. माणसाने हे लक्षात ठेवलं पाहिजे की जे लोक अशा आपत्तींमध्ये सापडतात, त्यांना मदत करणं ही ‘प्रेमभावना’ जपली पाहिजे आणि गरजूंना, गरीबांना योग्य ती मदत केली पाहिजे.

***